**ठळक बातम्या**

- गणेशोत्सवाच्या मंगल पर्वाची आज अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणेश विसर्जनानं सांगता, राज्यभरात विसर्जन मिरवणुकीला सुरुवात

- भारत आणि अमेरिका यांच्यात सकारात्मक, दूरदृष्टीपूर्ण, व्यापक आणि जागतिक धोरणात्मक भागीदारी असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- भारत रशियाकडून तेल खरेदी करत राहील अशी केंद्रीय अर्थमंत्र्यांची स्पष्टोक्ती

**आणि**

- आशिया करंडक हॉकी स्पर्धेत सुपर फोरमध्ये आज भारताचा सामना चीनविरुद्ध

**<><><><>**

गणेशोत्सवाच्या मंगल पर्वाची आज अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणेश विसर्जनानं सांगता होत आहे. गणेश विसर्जन सोहळ्यासाठी मुंबई-पुण्यासह स्थानिक प्रशासनांनी सुरक्षा, स्वच्छता, आरोग्य आणि पर्यावरणपूरक व्यवस्थेची काटेकोर आखणी केली आहे. ठिकठिकाणी विसर्जनासाठी कृत्रिम तलावांची व्यवस्था केली असून अनेक ठिकाणी मूर्तीदानाचा उपक्रम राबवण्यात येत आहे.

राज्यभरातल्या विसर्जन सोहळ्याचा आढावा ऐकूया आमच्या प्रतिनिधीकडून…..

**- - HOLD VC - -**

***(मुंबईचं** मुख्य आकर्षण असलेल्या लालबागचा राजा मंडळाच्या गणेशमूर्तीच्या विसर्जन मिरवणुकीला आज सकाळी सुरुवात झाली. विसर्जन मिरवणूक मार्गावर भाविकांची अलोट गर्दी झाली आहे. विसर्जन सोहळा निर्विघ्नपणे पार पडावा यासाठी मुंबई पोलीस सज्ज आहेत.*

*मुंबईतल्या २९० कृत्रिम तलावांची यादी www.mcgm.gov.in संकेतस्थळावर गुगल मॅप लिंकसह उपलब्ध आहे. QR कोड स्कॅन किंवा BMC WhatsApp Chatbot: ८९९९२२८९९९ वरून उपलब्ध केली असल्याची माहिती पालिकेनं दिली आहे.*

***पुण्यात*** *मानाच्या पहिल्या कसबा गणपतीला पुष्पहार अर्पण करून भव्य वैभवशाली मिरवणुकीला सुरुवात झाली. त्यानंतरच्या इतर मानाच्या गणपतींच्या विसर्जन मिरवणुकीलाही सुरवात झाली आहे.*

***छत्रपती संभाजीनगर*** *इथं घरगुती गणपती विसर्जनास सुरुवात झाली आहे.* ***रत्नागिरी*** *जिल्ह्यात जवळपास ३६ हजार ५०५ घरगुती आणि ६१ सार्वजनिक गणेशमूर्तींचं विसर्जन केलं जाणार आहे. यासाठी जिल्हा प्रशासनाने चोख व्यवस्था केली आहे.*

*पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी* ***नागपूर*** *महानगरपालिकेद्वारे शहरातील सर्व तलावांमध्ये गणेश मुर्तींच्या विसर्जनाला पूर्णत: बंदी घातली असून ४१९ कृत्रिम विसर्जन तलावाची व्यवस्था केली आहे.*

***नंदुरबार*** *मधल्या गणेश विसर्जन मिरवणूकीला आज सकाळी सुरवात झाली. दादा आणि बाबा गणपतीच्या रथांची हरीहर भेट ही या गणेश उत्सव मिरवणूकीच्या आकर्षणाचं केंद्रबिदु असते.* ***धुळ्या****तही सकाळपासूनच पांझरा नदीत गणपती विसर्जनासाठी भाविक गर्दी करत आहेत.*

*गणेश विसर्जन मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर* ***परभणी*** *जिल्हा पोलीस दलही सज्ज आहे.* ***जालना*** *शहरात महानगर पालिकेच्या वतीनं गणपती विसर्जनाची तयारी पूर्ण केली आहे.)*

दरम्यान, मुंबईत विसर्जन मिरवणुकांच्या पार्श्वभूमीवर ईद ए मिलाद निमित्तची मिरवणूक येत्या सोमवारी काढण्याचा निर्णय मुस्लिम समाजानं घेतला आहे.

**<><><>**

भारताच्या परकीय चलनसाठ्यात अंदाजे साडेतीन अब्ज डॉलर्सची वाढ नोंदवण्यात आली आहे. २९ ऑगस्टला संपलेल्या आठवड्यातली ही वाढ असून, हा साठा एकंदर ६९४ अब्ज डॉलर्सपेक्षा थोडा अधिक आहे. रिझर्व बँकेनं जारी केलेल्या आकडेवारीनुसार या साठ्याचा प्रमुख घटक असलेली परकीय चलन मालमत्ता देखील जवळपास ५८४ अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक असून त्यात साधारण दीड अब्ज डॉलर्सपेक्षा थोडी जास्त वाढ नोंदवण्यात आली आहे. सोन्याच्या साठ्यातही वाढ नोंदवण्यात आली असून ती साडे शह्याऐंशी अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक आहे.

**<><><>**

वस्तू आणि सेवा कर परिषदेनं ५६व्या बैठकीत वस्तू आणि सेवा कररचनेच्या सुसूत्रीकरणाला मान्यता दिली असून यापुढे फक्त ५ आणि १८ टक्के अशी दोन स्तरात जी एसटी कर आकारणी होईल. या सुधारणेचं स्वागत व्यापारी तसंच सामान्य नागरिकही करत आहेत.

जीएसटीच्या पुनर्चरनेमुळे अनेक वस्त्र आणि पादत्राणं स्वस्त झाली आहेत. हाताने विणलेले कपडे आणि भरतकाम केलेल्या शाली यांच्यावरचा कर १२ टक्के होता तो ५ टक्के करण्यात आला आहे. टोप्यांवरचा करही १२ टक्क्यावरून पाच टक्के करण्यात आला आहे. तसंच छत्र्यांवरचा करही १२ वरून ५ टक्के झाला आहे. त्यामुळे या वस्तू ग्राहकांना स्वस्त मिळणार आहेत. तसंच अडीच हजारांपेक्षा कमी दर असलेल्या पादत्राणांवरच्या करात कपात करून ते पाच टक्के करण्यात आले आहेत. तर अडीच हजारांपेक्षा जास्त दर असलेल्या कपड्यांवरचा कर १२ टक्क्यावरून वाढवून १८ टक्के झाला आहे.

ऐकूया यावर एका पैठणी विणकर कविता ढवळे यांची प्रतिक्रिया.....

***- होल्ड बाईट ढवळे - -***

**<><><><>**

राज्यातल्या शाळांमध्ये त्रिभाषा धोरण निश्चित करण्यासाठी शिक्षणतज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याबाबतचा शासन निर्णय काल प्रसिद्ध झाला. या समितीत भाषा सल्लागार समितीचे माजी अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, नॅशनल स्कूल ऑफ ड्रामाचे माजी संचालक डॉ. वामन केंद्रे, शिक्षणतज्ञ डॉ. अपर्णा मॉरिस, डेक्कन महाविद्यालयाच्या भाषा विज्ञान प्रमुख सोनाली कुलकर्णी, शिक्षणतज्ञ डॉ. मधुश्री सावजी आणि बालमानसतज्ञ डॉ. भूषण शुक्ल हे सदस्य असतील, तर समग्र शिक्षा अभियानाचे राज्य प्रकल्प संचालक संजय यादव सदस्य सचिव म्हणून काम पाहतील. येत्या तीन महिन्यांत ही समिती आपला अहवाल सरकारला सादर करेल.

**<><><><>**

भारत आणि अमेरिका यांच्यात अतिशय सकारात्मक, दूरदृष्टीपूर्ण, व्यापक आणि जागतिक धोरणात्मक भागीदारी आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी उभय देशांमधल्या संबंधांबद्दल केलेल्या

विधानावर त्यांनी समाज माध्यमावर प्रतिक्रिया दिली आहे. भारत आणि अमेरिकेतल्या संबंधाबाबत ट्रम्प यांनी अतिशय संवेदनशील आणि सकारात्मक भूमिका घेतल्याबद्दल प्रधानमंत्र्यांनी कौतुक केलं आहे.

भारत आणि अमेरिका यांच्यातले संबंध विशेष असून त्याबाबत चिंता करण्यासारखं काही नाही असं ट्रम्प यांनी काल प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितलं. भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे एक श्रेष्ठ प्रधानमंत्री असून ते आपले कायमच चांगले मित्र राहतील, असंही ट्रम्प म्हणाले.

<><><><>

भारत यापुढेही रशियाकडून तेल खरेदी करत राहील आणि कोणत्याही निर्णयामागे राष्ट्रहित सर्वोपरी असेल असं ठाम प्रतिपादन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केलं आहे. रशियाकडून तेलाची खरेदी असो किंवा अन्य मुद्दा असो, योग्य दर आणि लॉजिस्टिक्सनुसार आपल्या आवश्यकतांना प्राधान्य दिलं जाईल, असं त्या काल एका मुलाखतीत म्हणाल्या. भारताच्या आयातीत कच्च्या तेलाचं प्रमाण अधिक असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला.

नवीन जीएसटी प्रणालीमुळे वस्तूंचा खप वाढेल मात्र त्यामुळे भांडवली खर्चावर काहीही परिणाम होणार नाही, बहुतेक सर्व म्हणजे ९९ टक्के वस्तू आणि सेवा आता शून्य किंवा पाच किंवा १८ टक्के स्लॅब अंतर्गत येतात, असं त्यांनी सांगितलं. अमेरिकेनं ५० टक्के आयातशुल्क केल्यामुळे ज्या निर्यातदारांना फटका बसला आहे, त्यांच्यासाठी काही उपाययोजना करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे, आत्मनिर्भर भारताचं उद्दिष्ट केवळ सर्व वस्तूंचं उत्पादन भारतात करायचं असं नाही तर अनिश्चित जागतिक परिस्थितीत आत्मसन्मान अबाधित राखणं असंही आहे, असं सीतारामन म्हणाल्या.

<><><><>

पुरवठा साखळीतली लवचिकता अधिक बळकट करण्यासाठी भारतानं अत्यावश्यक खनिजांच्या देशांतर्गत क्षमता निर्मितीवर लक्ष केंद्रित केलं आहे. देशात अत्यावश्यक खनिज पुनर्वापराला चालना देण्यासाठी केंद्रीय मंत्रिमंडळानं नुकतीच पंधराशे कोटी रुपयांच्या प्रोत्साहन योजनेला मंजुरी दिली आहे. या उपक्रमामुळे किमान २७० किलो टन वार्षिक पुनर्वापर क्षमता विकसित होण्याची अपेक्षा आहे, ज्यामुळे सुमारे ४० किलो टन वार्षिक

महत्त्वपूर्ण खनिज उत्पादन होईल, त्याचबरोबर सुमारे ८ हजार कोटी रुपये गुंतवणूक तसंच जवळपास ७० हजार प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होईल अशी अपेक्षा आहे.

<><><><>

मुंबईत आत्मघातकी बॉम्बस्फोट घडवून आणायची धमकी देणाऱ्या व्यक्तीला मुंबई गुन्हे शाखेनं उत्तर प्रदेशच्या नोयडा इथून अटक केली. गुन्ह्यात वापरलेला मोबाईल आणि सिमकार्डही पोलिसांनी जप्त केलं. मुंबई वाहतूक पोलिसांच्या व्हॉट्सअॅप हेल्पलाइनवर काल हा मेसेज आला होता. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असं आवाहन मुंबई पोलिसांनी केलं आहे.

<><><><>

भिवंडीमध्ये कामतघर परिसरातल्या एका इमारतीला काल रात्री आग लागली. यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही. आगीचं कारण अद्याप स्पष्ट झालेलं नाही. या इमारतीमध्ये कपडयांना रंगकाम करण्याचं काम केलं जात होतं.

<><><><>

आशिया करंडक हॉकी स्पर्धेत सुपर फोरमध्ये आज भारताचा सामना चीनविरुद्ध होणार आहे. आत्तापर्यंत भारतानं एका सामन्यात विजय मिळवला आहे, तर दुसरा सामना अनिर्णित राहिला आहे. सुपर फोरच्या पदकतालिकेत भारत सध्या पहिल्या क्रमांकावर आहे. या संपूर्ण स्पर्धेत भारत अजेय राहिल्यानं आशिया करंडकासाठी प्रबळ दावेदार मानला जात आहे. सुपर फोरच्या दुसऱ्या सामन्यात कोरियासमोर मलेशियाचं आव्हान असणार आहे.

<><><><>

अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत महिला एकेरीत अमांडा अनिसिमोव्हा आणि अग्रमानांकित अरीना साबालेंका एकमेकींविरुद्ध मैदानात उतरणार आहेत. भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री साडेबारा वाजता हा सामना सुरू होईल.

दरम्यान, पुरुष एकेरीच्या उपांत्य सामन्यात यानिक सिनर यानं फीलिक्स ऑजर अलियासीम याच्यावर ६-१, ३-६, ६-३, ६-४ अशी मात करून अंतिम फेरीत प्रवेश केला. अजिंक्यपदासाठी त्याचा सामना कार्लोस अल्काराज याच्यासोबत होईल. कार्लोस यानं नोव्हाक जोकोविचवर ६-४, ७-६, ६-२ असा विजय मिळवला.

महिला दुहेरीत गॅब्रिएला दाब्रोवस्की आणि एरिन राऊटलिफ यांनी अग्रमानांकित कॅटरीना सिनियाकोव्हा आणि टेलर टाऊनसेंड या जोडीवर ६-४, ६-४ अशी सहज मात करून अजिंक्यपद पटकावलं. तर मिश्र दुहेरीत सारा एरानी आणि अँड्रिया वावासोरी यांनी इगा श्वियांतेक आणि कॅस्पर रूड या जोडीवर विजय मिळवून अजिंक्यपद कायम राखलं. पुरुष दुहेरीच्या अंतिम फेरीत आज मार्सेल ग्रॅनोलर्स आणि होराशियो झेबालोस ही जोडी जो सॅलिसबरी आणि नील स्कूपस्की यांच्याविरुद्ध लढत देईल.

**<><><><>**

कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रात आज मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. तर मराठवाड्यात सोसाट्याचा वारा, वीजांसह मुसळधार पाऊस पडेल असा अंदाज आहे. पालघर, नंदुरबार, धुळे तसंच नाशिक घाट परिसरात पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून उत्तर कोकणातही मुसळधार पावसाची शक्यता आहे. तसंच एनडीआरएफ आणि एसडीआरएफच्या पथकांनी आपत्कालीन परिस्थितीकरता सतर्क राहण्याच्या सूचना प्रशासनानं दिल्या आहेत.

**//<><><><>//**